# कार्यालय मुख्य बिजोत्पादन अधिकारी,
# मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, डॉ. पंदेकृवि, वणी रंभापूर

जा.क्र./मप्राप्र/विकास/ १८० /२०२६
कार्यालय, मुख्य बिजोत्पादन अधिकारी,
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर.
दि:– २९/०५/२०२६

**प्रती,**

प्रभारी अधिकारी
कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष
डॉ.पं.दे.कृ.वि.अकोला.

**विषय :– मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,डॉ.पं.दे.कृ.वि.वणी रंभापुर अंतर्गत विविध प्रक्षेत्रावर जे.सी.बी. मशिनव्दारे कामे करणे करीता निविदा दरपत्रक विद्यापीठ संकेतस्थळावर व्यापक प्रसिध्दी देणे बाबत.**

महोदय ,

उपरोक्त विषयास अनुसरून मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापुर डॉ. पं.दे.कृ.वि. अंतर्गत विविध प्रक्षेत्रावर जे.सी.बी. मशिनव्दारे कामे करण्याचे प्रस्तावित आहे. सदर कामा बाबत या कार्यालयाव्दारा निविदा दरपत्रक सुचना तयार केलेल्या आहेत. त्या अनुषंगाने सदर निविदा दरपत्रक सुचनांना विद्यापीठ संकेतस्थळावर टाकुन व्यापक प्रसिध्दी देण्याचे करावे. तपशील खालील प्रमाणे.

| अ.क्र | विविरण | दर प्रती तास | कामाचे दर रू. प्रति तास GST सह |
|---|---|---|---|
| १ | जे.सी.बी. मशीन | | |

वरील तपशील प्रमाने सदर कामा बाबत **दिनांक ०५/०६/२०२६** पर्यत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफामध्ये खालील दिलेल्या नियम व अटीना अनुसरून सादर करावे.

**नियम व अटी**

१. निविदा दरपत्रक कार्यालयीन कामाजाच्या दिवशी वेळ १०.०० ते ५.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.
२. निविदा दरपत्रक/कोटेशन हे मुख्य बिजोत्पादन अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,वणी रंभापुर यांच्या नावे सीलबद लिफाफामध्ये पाठवावी.
३. निविदा दिलेल्या कालावधी पर्यत कार्यालयीन वेळेत पोहचेल या बेताने पाठवने. त्यानंतर प्राप्त होणारी निविदा ग्राह्य धरण्यात येणार नाही.
४. निविदा दर पत्रकावर SALE TAX/CST/BST/GST/TIN या पैकी आवश्यक असलेला नंबर नमूद करावा
५. सदर निवादा दरपत्रक/कोटेशनचे दर हे मार्च २०२७ पर्यत ग्राह्य राहिल.
६. निविदा स्वीकारणे अथवा रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांना असतील.
७. निविदा सादर करतांना निविदा पाकिटावर मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणी रंभापूर अंतर्गत विभागाचे प्रक्षेत्रातील, काटेरी झुडपाचे जमिनी लागत असलेले जे.सी.बी. प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,कामे करण्याबाबत असा स्पष्ट उल्लेख असावा.
८. निविदामधील संबंधित निविदाधारकाचे दर नियमाप्रमाणे सर्व करासह नमूद करयात यावे तसेच त्या कराचा विहित मुदतीमध्ये भरणा करण्याची संपूर्ण जबाबदारी संबधीत निविदाधारकाची राहील. करा सबंधी कोणतीही तक्रार असल्यास हे कार्यालय/विद्यापीठ जबाबदार राहणार नाही.
९. निविदाधारकाने प्रक्षेत्रावरील विभागासंबंधित कामे करण्यासाठी वापरण्यात येणा–या पुरूष मजुरांचे व्यवस्थापनाची संपूर्ण जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची राहील.

(PTO)

१०. विभागावर देण्यात आलेले कामे पूर्ण करण्यात यावे. कामाबाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहिल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.
११. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या नियमांचे पालन करणे संबंधित निविदा धारकांना बंधनकारक राहील. तसेच देयक सादर करतेवेळी बॅंक खातेबाबतची संपूर्ण माहिती सादर करावी.
१२. या कार्यालया तर्फे संबंधीत कामे करण्याकरीता कोणत्याही प्रकारचे साहित्य पुरविण्यात येणार नाही. संबंधित काम करण्याकरीता आवश्यक साहित्य उपलब्ध करून देण्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकांची राहील.
१३. निविदा धारकास काम पूर्ण व विहित वेळेत केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.
१४. प्रक्षेत्राचे विभागाचे कामे तसेच इतर विभाग संबंधित कामे करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/मा. मुख्य बिजोत्पादन अधिकारी यांचे समक्ष मिटविला जाईलच अंतिम निर्णय मुख्य बिजोत्पादन अधिकारी, वणी रंभापूर यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.
१५. विभागावर प्रक्षेत्रातील कामाकरीता पुरविण्यात आलेले यंत्र चांगल्या स्थितीत असावे व सोबत असलेले अवजारे/यंत्र चांगल्या दर्जाचे असणे आवश्यक राहील. तसेच सर्व कामे हि कार्यालयीन वेळेतच करून घेण्यात येईल.
१६. ज्या विभागावर काम उपलब्ध असेल त्याच विभागावर काम करावे लागेल.
१७. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे. अर्धवट काम सोडून गेल्यास कामाचे देयक काढण्यात येणारे नाही.
१८. जे.सी.बी. मशीनने कामे करत असतांना कोणत्याही प्रकारचे नुकसान जीवितहानी व अपघातास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत निविदाधारकाची राहील. कामे करत असतांना विद्यापीठ मालमत्तेचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होणार नाही याची जबाबदारी घ्यावी. होणा—या नुकसानीस सर्वस्वी कंत्राटीधारकास जबाबदार धरण्यात येईल व नुकसान भरपाईची वसुली करून घेण्यात येईल.
१९. कार्यलयीन पध्दतीप्रमाणे समाधानकारक कामाचे देयक अकोला कार्यालयाकडून मंजूर झाल्यावरच आपल्याला कामाचा मोबदला/देयक खर्च दिले जाईल त्यामुळे वरवर विचारणा करू नये.
२०. सेवा पुरविणा—या कंत्राटदारास शासनाच्या निर्देशानुसार सर्व कराचा भरणा कराची जबाबदारी कंत्राटदारांची याबाबतील काही तंटा निर्माण झाल्यास कार्यालय हस्तक्षेप करणार नाहीत व कोणतीही या कार्यालयाचा अधिकारी अथवा विद्यापीठाची जबाबदार राहणार नाही.
२१. मशीनवर काम करतेवेळी इजा, अपघात अथवा मृत्यू संभाविल्यास किंवा नैसर्गिक आपत्ती उदाप्राणी आणि वादळामुळे मशिनरी,पाऊस, भूकंप, विज इजा अपघात अथवा मृत्यू संभविल्यास त्याची सर्व भरपाई आणि इतर कायदेशीर जबाबदारी कंत्राटदाराची राहील. याचा या कार्यालयाशी अथवा विद्यापीठाशी कुठल्याही प्रकारचा संबंध राहणार नाही.
२२. मशीनव्दारे करण्याचे काम सब कॉन्ट्रॅटर/कंपनी किंवा इतर व्यक्तीना देण्यात येणार नाही तसे केल्याचे निदर्शनास आल्यास संबंधितांचा करार रद्द करण्यात येईल आणि त्यानंतर कार्यालयाचा तसेच विद्यापीठ कोणात्याही प्रक्रियेत संबंधित कंत्राटदारास भाग घेता येणार नाही.
२३. कंत्राटदार यांनी विभागावर काम करीता असतांना वसू व सेवा कर (GST) २% व आयकर टीडीएस २% हे देयक रक्कमेवर कपात करण्यात येईल व संबंधित कंत्राटदारास सदर कर कपातीचा त्रैमासिक परतावा दाखल करून सदर कराचा परतावा मिळवता येईल.
२४. कामाचा आदेश मिळालेल्या कंत्राटदारास प्रक्षेत्रावर प्रत्यक्ष काम सुरू असतांना काम सुरळीत चालण्याचे दृष्टीने कंत्राटदार स्वत: अथवा पूर्णवेळ पर्यवेक्षक नेमून कामाचा सतत पाठपुरावा व देखरेख करणे बंधनकारक राहील. सुरळीत व वेळेत काम पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी हि कंत्राटदाराची राहील.
२५. निविदाव्दारे कामाचे दर सादर करीता असतांना (GST) सर्व करासह सादर करावे.
२६. निविदा प्रक्रियेतील वरील नमूद सर्व अटी व शर्ती मान्य असलेल्या कंत्राटदारयांनी निविदा सादर कराव्या

मुख्य बिजोत्पादन अधिकारी
मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र,
वणी रंभापूर

प्रतिलिपी माहितीस व कार्यवाहीस:
ग्रामपंचायत कार्यालय वणी रंभापूर/राजापूर/पैलपाडा/अन्वी/मिर्झापूर/कोठारी/ढगा/तामशी/काटेपूर्णा/तानखेड/बोरगाव